**<u>मार्गदर्शक सुचना</u>**

जा.क्र. कृ.यां.उ.अ./मा.सू. (घ-४)/गुनि-५/१३७/१४-१५
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य्, पुणे - ४११ ००१
दिनांक : ११ सप्टेंबर २०१४

प्रति,

१) जिल्हाधिकारी ------------------------------ (सर्व)
२) विभागीय कृषि सहसंचालक -------------------(सर्व)
३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------- (सर्व)
४) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद --------(सर्व)

विषय : **सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियांनांतर्गत कृषि यांत्रीकीकरण उपअभियान अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सुचना – घटक ४ : भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यासाठी कृषि औजारे बॅन्कची स्थापना करणे**

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाच्या कृषि यांत्रीकीकरण उपअभियान मार्गदर्शक सुचना
२) शासन निर्णय क्र.कृयाउ-२०१४/प्र.क्र.१२४/४ ए, दिनांक ०३ जुन २०१४
३) आयुक्तालयाच्या अंतरीम मा.सू.क्र. कृयांउअ/गुनि-५/मा.सु./१०४/२०१४ दि.७/७/२०१४
४) केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. ३-४ (१५) २०१४ M&T (I&P) दि. ९ जुलै २०१४
५) मार्गदर्शक सुचनांचे प्रारुपास मान्यते बाबत शासन पत्र क्र.कृयांउ-२०१४/प्र.क्र.१२४/४अे, दिनांक ९/९/२०१४

सन २०१४-१५ मध्ये राज्यात राबविण्यात येणा-या कृषि यांत्रीकीकरण उपअभियानाच्या अंमलबाजवणीच्या दृष्टीने पूर्वतयारीबाबत अंतरीम मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाच्या संदर्भिय दिनांक ७/८/२०१४ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या असून त्या कृषि विभागाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदर उपअभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने जिल्हयाचा आराखडा व घटक निहाय लाभार्थी निवडीच्या प्रक्रीयेस आरंभ केला असेलच. कृषि आयुक्तालयाने केंद्र शासनास प्रस्तावीत केलेल्या घटकनिहाय कार्यक्रमानुसार प्रस्तावीत विभाग/जिल्हा निहाय भौतीक/आर्थिक लक्षांक आपणास यापूर्वी कळविले् आहेत. केंद्र शासनाची प्रस्तावीत कार्यक्रमास अद्याप अंतीम मान्यता प्राप्त व्हायची आहे. अंतीम मान्यतेनंतर विभाग/जिल्हा निहाय लक्षांकात काही बदल झाल्यास त्यानुसार आपणास अवगत करण्यात येईल. तथापि, अंमलबजावणीच्या पूर्वतयारीची कार्यवाही आपण तत्पूर्वी पूर्ण करणे क्रमप्राप्त आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भिय दिनांक ९ जुलै २०१४ च्या पत्रानुसार प्रस्तावीत कार्यक्रमापैकी घटक क्र.४ ‘‘भाडे तत्वावर कृषि यांत्रिकीकरण सेवेसाठी कृषि औजारे बॅन्क स्थापन करणे’’ या घटकाखाली आर्थिक तरतुदीस मान्यता दिली आहे. त्यादृष्टीने राज्य शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्तावीत केले आहे. अंमलबजावणीच्या दृष्टीने यापूर्वी सदर घटकाच्या निर्गमीत केलेल्या अंतरीम मार्गदर्शक सूचनांवर आधारीत सविस्तर मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**<u>पार्श्वभूमी</u> :**

राज्यातील बहुतांश भाग कोरडवाहु सदरात येत असल्याने कृषि औजारे/उपकरणे शेतक-यांना स्वतः खरेदीस स्वाभाविक मर्यादा येतात. याचा विचार करता कृषी औजारांच्या सेवा सुविधा शेतक-यांना प्रचलीत भाडेदरापेक्षा कमी दराने उपलब्ध करुन दण्याचे दृष्टीने कृषी औजारे सेवा सुविधा केंद्रे (कृषि औजारे बॅन्क) स्थापन करणे हा प्रमुख उद्देश आहे.

**घटकाचे उद्देश :**

१) जिल्ह्यामध्ये ज्याभागात कृषि क्षेत्रात उर्जा वापराचे प्रमाण कमी आहे तेथे यांत्रीकीकरणास प्रोत्साहन देणे.

२) सदर क्षेत्रातील पीक रचनेनुसार पिकाच्या पेरणीपासुन काढणीपश्चात प्राथमीक प्रक्रियेपर्यंत शेतक-यांना माफक दराने यांत्रीकीकरणाची सेवा भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणे.

३) लहान व सिमांतीक शेतक-यांना कृषि यांत्रीकीकरण सुविधेचा लाभ घेता येणे.

४) या प्रक्रियेत प्रगतीशील शेतकरी, शेतक-यांचे नोंदणीकृत गट, ग्रामीण उद्योजक यांचा अंतर्भाव करुन माफक भाडे तत्वावर शेतक-यांना कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविधा पुरविणे व सामुग्रीची देखभाल करणे.

५) कृषि उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्रसामुग्रीचा प्रचार करणे.

**कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी भौतीक/अर्थीक लक्षांक :**

राज्यातील कृषि विभागाच्या उपविभागांतील प्राधान्याने कोरडवाहू क्षेत्रात कृषी औजारे सेवा सुविधा केंद्रे (कृषि औजारे बॅन्क) स्थापन करण्यात यावी. त्यासाठी जिल्हानिहाय कृषि औजारांवरील रु.१०.०० लाख भांडवली गुंतवणुकीचे केंद्र व रु.२५.०० लाख भांडवली गुंतवणुकीचे केंद्र अशा दोन प्रकारात केंद्रे स्थापन करावयाची आहेत. सदर केंद्रांसाठी स्थानीक भौगोलीक परिस्थिती व पीक रचनेनुसार आवश्यक कृषि औजारांची निवड संबंधीत लाभधारकांनी करावयाची आहे. अनुदान केवळ कृषि औजारांच्या खरेदी किमतीवरच मर्यादीत राहील. कृषि औजारे खरेदी किमतीच्या ४० टक्के अनुदान मर्यादा राहील, म्हणजेच कृषि औजारांवरील रु.१०.०० लाख भांडवली गुंतवणुकीच्या केंद्रास रु.४.०० लाख अनुदान अनुज्ञेय राहील तर कृषि औजारांवरील रु.२५.०० लाख भांडवली गुंतवणुकीच्या केंद्रास रु.१०.०० लाख अनुदान अनुज्ञेय राहील. जिल्हा निहाय भौतीक/अर्थीक लक्षांकाचा तपशील सोबत सहपत्रीत केला आहे **(प्रपत्र-१)**.

**सेवा-सुविधा केंद्रे स्थापन करताना गावांच्या निवडीचे निकष :**

कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्र (कृषि औजारे बॅन्क) स्थापनेसाठी गावांची निवड करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा स्तरीय समितीने खालील निकष पाळणे बंधनकारक राहील.

अ) कृषि क्षेत्रात कमी प्रमाणात उर्जा वापर असलेली गावे. (सध्या राज्यातील जिल्हानिहाय कृषि क्षेत्रातील उर्जावापर दर्शविणारा तक्ता सोबत सहपत्रीत केला आहे **(प्रपत्र-२)**. त्यात सद्यस्थितीनुरुप कृषि विद्यापीठातील तज्ञांचे सल्याने सुधारणा करण्यास हरकत नाही.)

ब) ट्रॅक्टरची संख्या कमी प्रमाणात असलेली गावे.

क) अल्प व अत्यल्प जमीनधारकांचे प्रमाण अधिक असलेली गावे.

ड) सध्या कृषि उत्पादकता कमी असलेली परंतू उत्पादकता वाढीस वाव असलेली गावे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. संबंधीत अर्जदाराकडे कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक अनुभव, प्रशिक्षीत व अनुभवी पुरेसे मनुष्यबळ असणे बंधनकारक राहील. तसेच, सदर यंत्रसामुग्री व उपकरणे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक जागा व शेडची व्यवस्था असणे बंधनकारक राहील.

२. जिल्हयातील पीकरचनेनुरुप आवश्यक असणा-या जमीनीची पूर्वमशागत ते पीक काढणी पश्चात तंत्रज्ञानासाठी आवश्यक सर्व यंत्रसामुग्री व उपकरणे संबंधीतांनी माफक भाडे तत्वावर उपलब्ध करुन त्यांच्या सेवा शेतक-यांना वेळोवेळी पुरविणे बंधनकारक राहील.

३. लाभधारकाने कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा शेतक-यांना पुरविल्याबाबत आवश्यक अभिलेख ठेवणे व त्याचा नियमीत अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत तपासणीच्या वेळी सर्व

यंत्रसामुग्री/उपकरणे व अभिलेख सादर करणे बंधनकारक राहील. (अभिलेख नोंदणीचे प्रपत्र सहपत्रीत केले आहे.)

४. सदर कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणा-या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील. संबंधीत सेवा-सुविधा केंद्रांची केंद्रे व्यवस्थित चालविणे व वेळोवेळी त्यात सुधारणा करण्याची तयारी असणे आवश्यक राहील.

५. सदर यंत्रसामुग्री व उपकरणे यांची परिवाहन विभागाकडे नोंदणी (रजिस्ट्रेशन), विमा, कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारकांची राहील.

६. यासाठी मार्गदर्शक सुचनांसोबत सहपत्रीत केलेल्या हमीपत्रानुसार बॉन्ड पेपरवर हमीपत्र सादर करणे संबंधीत लाभधारकांना बंधनकारक राहील. **(प्रपत्र-३)**

७. सदर लाभार्थ्यास अनुदानावर मिळणा-या औजारांचे कोणत्याही परिस्थितीत पुढील किमान ६ वर्षे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाण ठेवता येणार नाहीत.

८. संबंधीत लाभधारकांसाठी त्यांना आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री व औजारांची त्यांच्या कार्यक्षेत्रातील पीक रचनेनुसार निवड करावी. (सुलभ संदर्भासाठी कृषि हवामान प्रकारानुरुप व पीक रचनेनुसार आवश्यक कृषि औजारांची गरज सोबतच्या तक्त्यात दर्शविली आहे **(प्रपत्र-४)**, त्यात संलग्न कृषि विद्यापीठातील तज्ञांच्या सल्याने इतर औजारांचा गरजेनुरुप अंतर्भाव करण्यास हरकत नाही.)

९. प्रत्येक लाभधारक सेवा-सुविधा केंद्राची सेवा-सुविधा पुरविण्याची क्षमता किमान १० हेक्टर प्रती दिवस आणि किमान ३०० हेक्टर प्रती हंगाम क्षेत्रासाठी असणे बंधनकारक राहील.

१०. संबंधीत अर्जदाराने ज्यांचे नावे अनुदान अदा करावयाचे त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, बॅन्क खाते क्रमांक, बॅन्केच्या शाखेचा पत्ता, एक रद्द केलेला चेक अर्जासोबत देणे बंधनकारक राहील.

११. ज्या गटांना यापूर्वी कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविध पुरवठयासाठी लाभ देण्यात आला आहे अशा गटांची फेर निवड करण्यात येवू नये.

१२. वरील निकषांव्यतिरिक्त योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने स्थानीक परिस्थितीनुरुप आवश्यक ते अतिरिक्त निकष जिल्हा स्तरीय समितीने ठरविण्यास हरकत नाही.

**<u>लाभार्थी निवड</u> :**

कृषि औजारे बॅन्कद्वारे कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा माफक दरावर पुरविण्यासाठी स्थापन करावयाच्या कृषि औजारे केंद्रासाठी प्रगतीशील शेतकरी, ग्रामीण उद्योजक व शेतक-यांचे स्वयंसहाय्यता गट यांची निवड करावी. यासाठी जिल्हा स्तरावरुन या घटकास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देवून इच्छूक लाभार्थींचे अर्ज तालुका कृषि अधिकारी स्तरावर मागवावेत. सदर अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे, आधार कार्डची स्वाक्षांकीत प्रत, रद्द केलेल्या चेकची प्रत जोडणे आवश्यक राहील.

सदर अर्जांची निकषांनुसर प्राथमीक छानणी ज्या उपविभागात केंद्र स्थापन करावयाचे आहे तेथील उपविभागीय कृषि अधिकारी, संबंधीत तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी व संबंधीत तालुक्याचे कृषि अधिकारी, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या समितीने करुन त्यांच्या शिफारसीसह अर्ज जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावेत. पात्र अर्जांची प्राप्त दिनांकानुसार क्रमवारी लावावी, जेणेकरून प्रथमप्राप्त प्रथम प्राधान्य या तत्वावर निवड प्रक्रीयेस सुलभता येईल.

जिल्हास्तरावर संदर्भीय शासन निर्णय दिनांक ०३ जुन २०१४ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा स्तरीय समितीने सदर अर्जांची छानणी करुन जिल्हयास दिलेल्या लक्षाकांनुरुप लाभार्थींची निवड करावी. याबाबत योजनेच्या सफलतेच्या दृष्टीने समितीने काटेकोरपणे कार्यवाही करुनच लाभधारक निवडावेत. निवड प्रक्रीयेत निवड झालेल्या व न झालेल्या लाभधारकांच्या बाबत सुस्पष्ट कारणमिमांसा निवड

समितीच्या सभेच्या इतिवृत्तांतात नमुद करावी. ही जबाबदारी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. निवड प्रक्रीयेत प्राप्त व पात्र अर्जानुसार आवश्यकतेनुरुप प्रतिक्षा यादी तयार ठेवावी.

जर निवड केलेल्या एखाद्या लाभार्थ्याने असमर्थता दर्शविल्यास प्रतिक्षा यादीतील प्रथम क्रमांकास प्रथम प्राधान्याप्रमाणे पुढील पात्र अर्जदाराची निवड करावी. निवड प्रक्रीयेतील एखाद्या लाभधारकाची काही सबळ कारणास्तव निवड रद्द करणे गरजेचे असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नोंदवून व तसे संबंधितांना लेखी कळवून पुरेशी संधी देवून, त्याबाबत नोंदी ठेवून तदनंतर निवड रद्द करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीस राहतील. निवड प्रक्रीयेत पूर्णतः पारदर्शकता ठेवण्याची दक्षता घ्यावी व लाभधारकांची यादी जिल्ह्याच्या संकेत स्थळावर तसेच नोटीसबोर्डवर प्रसिध्द करावी. केंद्र शासनाच्या धोरणानुसार अनुदानाचा लाभ देताना सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती प्रवर्ग व अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थीना अनुदानाचा लाभ द्यावा.

जिल्ह्यांतर्गत प्राप्त पात्र अर्जदारांनुसार उपविभागांतर्गत काही बदल करणे क्रमप्राप्त असल्यास असे बदल करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीस राहतील. तसेच, विभागांतर्गत एखाद्या जिल्ह्यातील लक्षांकात बदल करावयाचे झाल्यास त्याचे अधिकार संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांना राहतील. मात्र, त्या परिस्थितीत संबंधीत जिल्हा स्तरीय समितीचे सुस्पष्ट लेखी अभिप्राय घेणे बंधनकारक राहील.

**<u>कृषि औजारे बॅन्कसाठी औजारांची निवड</u> :**

१. कृषि औजारे बॅन्कद्वारे कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्र स्थापन करणा-या उद्योजकाने संबंधीत क्षेत्रातील पीक रचनेनुरुप जमीनीची पूर्वमशागत ते पीक काढणी-प्रक्रीया यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व औजारांची निवड करावी.

२. एका पीक हंगामात किमान ३०० हेक्टरसाठी सेवा-सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने आवश्यक क्षमतेची यंत्रसामुग्री व औजारांची निवड करणे अपेक्षीत आहे.

३. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांसोबत प्राप्त कृषि औजारांची यादी आयुक्तालयाच्या यापूर्वी निर्गमीत केलेल्या अंतरीम मार्गदर्शक सुचनांतील प्रपत्र -१ घटक क्र. ३ नुसार कळविण्यात आली आहे. त्यानुसार औजारांची निवड स्थानिक परिस्थितिनुरुप करता येईल. तसेच, राज्य स्तरीय कृषि यांत्रीकीकरण कार्यशाळेत कृषि विद्यापीठातील तज्ञांनी सुचविल्यानुसार कृषि हवामान प्रकार व पीक रचनेनुरुप औजारे संचाची यादीही सोबत सहपत्रीत केली आहे. त्यातुन आपल्या जिल्ह्यातील पीक रचनेनुरुप औजारे औजारांची निवड करावी.

**<u>कृषि औजारे बॅन्कसाठी औजारे खरेदी</u> :**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निवड केलेल्या लाभधारकांना केंद्र शासनाच्या यादीतील व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या औजारांपैकी त्यांच्या पसंतीने कोणत्याही ब्रॅन्डची कृषि औजारे खरेदी करण्याची मुभा राहील. मात्र, खरेदी केलेल्या औजारांपैकी जी औजारे केंद्र शासनाच्या तपासणी संस्था किंवा केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या संस्थांकडून तपासणी केलेली आहेत त्यांनाच अनुदान अनुज्ञेय राहील. सद्यस्थितीत शासनाने सन २०१३-१४ साठी शासन निर्णय क्र. सुकृऔ-२०१३/प्र.क्र.१५८/११-ए, दि. २७ सप्टेंबर २०१३ अन्वये निर्धारीत केलेल्या कृषि औजारे दरांमधील सर्व औजारे सदर संस्थांकडून तपासणी केलेली असून महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ या शासन नियुक्त पुरवठा संस्थेकडून पुरविण्यात येत आहेत. सदर शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ साठी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. ट्रॅक्टर व पॉवर टिलर्सची केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या मॉडेल्सची यादी व त्यांचे तपासणी अहवाल क्रमांक केंद्र शासनाच्या कृषि विभागाच्या एम ॲन्ड टी डिव्हीजनच्या संकेत स्थळावर (www.farmech.gov.in) उपलब्ध आहेत. **निवड केलेल्या लाभधारकांनी सदर तपासणी केलेल्या सर्व औजारे संचांची खरेदी प्राथम्याने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून त्यांच्या पसंतीनुसार करावी. त्यांच्याकडे सदर औजारांची उपलब्धता नसल्यास त्याबाबत खात्री करुन त्याच दर्जाच्या, मॉडेलच्या, स्पेसीफीकेशन्सच्या औजारांची**

**खुल्या बाजारातून सुरुवातीस संपूर्ण रक्कम स्वतः भरुन खरेदी करावयाची आहे. पुरवठा संस्थेने संपूर्ण रक्कम प्राप्त होताच तात्काळ संबंधीतांच्या पसंतीच्या औजारांचा पुरवठा करावा. जी औजारे ते वेळेवर पुरवठा करु शकत नसतील त्याबाबत संबंधीतांना लेखी तात्काळ कळविणे व त्याची प्रत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना द्यावी. तसेच, लाभधारकाने अदा केलेल्या बीलाच्या चार प्रती कराव्यात. त्यातील दोन प्रती लाभधारकास द्याव्यात. एक प्रत पुरवठा संस्थेने संबंधीत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना पाठवावी. अर्जदाराने सर्व औजारे सुस्थितीत प्राप्त झाल्याची खात्री करुन बीलाची एक प्रत स्वतःकडे ठेवून बीलाच्या दुस-या प्रतीसह अनुदान मागणीसाठी संबंधीत तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या शिफारसीसह संयुक्त पथकाद्वारे तपासणीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे विनंती करावी.**

औजारे बॅन्कसाठी सर्व खरेदी नंतर प्राप्त प्रकरणांची जिल्हा स्तरीय संयुक्त तपासणी पथकाने प्रत्यक्ष भेट देवून खात्री करावी. सदर संयुक्त पथक जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिनस्त कार्यरत राहील. पथकात संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद व संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचा समावेश राहील. सदर पथकाने सोबत सहपत्रीत केलेल्या संयुक्त तपासणी प्रपत्राचे नमुन्यात सर्व नोंदी करुन स्वाक्षरी करावी. सदर पथकाच्या प्रत्यक्ष तपासणी नंतरच संबंधीत लाभधारकांस अनुदान अनुज्ञेय राहील. संयुक्त तपासणी पथकाच्या अहवालाची एक प्रत त्यांनी लाभधारकास द्यावी. सदर प्रतीसह व देयकांच्या प्रतींसह लाभधारक अनुदानासाठी मागणी अर्ज जिल्हा कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील. सदर अर्जाचा नमुना सोबत सहपत्रीत केला आहे.

औजारे बॅन्क प्रकारानुरुप संपूर्ण रु.१०.०० लाख किंवा रु.२५.०० लाख रकमेच्या औजारे संचांची खरेदी करणे बंधनकारक आहे. सदर सर्व औजारांची निर्धारीत मानकांनुसार खरेदी केल्याची व विमा, कर इत्यादी भरणा केल्याची खात्री संबंधीत तालुका कृषि अधिकारी आणि उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करुन तसे प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर केल्यानंतर अनुदानाची रक्कम संबंधीत लाभधारकाच्या बॅन्क खात्यात जमा करावी.

**जबाबदारी :**

**तालुका कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी :** अर्जदारांच्या प्रस्तावांची उपविभाग स्तरावर प्राथमीक छानणी करुन प्रस्तावांची जिल्हा कृषि अधिकारी यांचेकडे शिफारस करणे. अर्जदाराच्या प्रस्तावानुसार प्रत्यक्ष पहाणी करुन वस्तुस्थिती आधारीत अहवाल देणे. संयुक्त तपासणीबाबत कार्यवाहीस सहकार्य करणे. केंद्रास आवश्यकतेनुरुप तांत्रीक मार्गदर्शन करणे. योजनेस शेतक-यांमध्ये प्रसिध्दी देणे. वेळोवेळी केंद्रास भेटी देवून त्यांचे कार्यवाहीचा आढावा घेणे व अभिलेख तपासणे.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :** अर्जदारांच्या प्रस्तावांची जिल्हा स्तरावर छानणी करुन अंतीम निवड जिल्हा स्तरीय समितीच्या मान्यतेने जाहीर करणे. अर्जदाराच्या प्रस्तावांची संयुक्त पथकाद्वारे प्रत्यक्ष तपासणी करुन वस्तुस्थिती आधारीत अहवाल करणे. लाभधारकास अनुदानाची अदायगी करणे. तालुकानिहाय भाड्याचे प्रती औजार, प्रती तास/दिवस, प्रती हेक्टर भाडेदर निर्धारीत करणे. जिल्हा स्तरावर अंमलबजावणीचे सर्वस्वी संनियंत्रण करणे. विहीत प्रपत्रात नियमीत अहवाल सादर करणे. जिल्ह्याचे विहीत प्रपत्रात उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे.

**विभागीय कृषि सहसंचालक :** विभागीय स्तरावर योजनेचे पर्यवेक्षण व संनियंत्रण तदनुषंगाने सर्व जबाबदा-या पार पाडणे. विभागाचे विहीत प्रपत्रात उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे.

**संनियंत्रण :**

स्थापन करण्यात येणा-या कृषि औजारे बॅन्कद्वारे चलित सेवा-सुविधा केंद्रांना औजारांची देखभाल दुरुस्ती याबाबत प्रशिक्षण व तांत्रीक मार्गदर्शन नजीकच्या कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विद्यापीठे, नोंदणीकृत उत्पादक, पुरवठा संस्था यांचे माध्यमातून देण्यात यावे.

सदर उपअभियानांतर्गत स्थापीत कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्रांचे पर्यवेक्षण जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. सदर केंद्रे ज्या हेतूने स्थापन करण्यात येत आहेत त्यानुसार काम करतात का? सदर क्षेत्रातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना प्रचलीत भाडे दरापैक्षा किमान २५ टक्के कमी दराने सेवा-सुविधा पुरविली जाते का? केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत का हे तपासण्याची व वेळोवेळी त्यांना सुचना देण्याची व आवश्यकतेनुरुप कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. याबाबत संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांचे समन्वयाने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. त्यांचीही सदर प्रक्रीयेत तेवढीच जबाबदारी राहील.

**भागीदारी :**

सार्वजनीक खाजगी भागीदारीतूनही (पीपीपी मोड) कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्रे उत्पादकांनी स्थापन करण्यास हरकत नाही. उत्पादक/पुरवठादार यांना जिल्ह्यात स्थापन करण्यात येणा-या केंद्रांना देखभाल, दुरुस्तीबाबत कार्यवाहीसाठी प्रोत्साहीत करावे. अद्यावत कृषि औजारांची उपयुक्तता व माहीती मिळण्याचे दृष्टीने त्यांनी लाभधारकांच्या सहभागाने जवळपासच्या जिल्ह्यात, केंद्रांवर भेटी आयोजीत कराव्यात. सदर केंद्रांबरोबर वार्षीक देखभाल करार करणे, सुट्याभागांचा पुरवठा करणे इत्यादीसाठी उत्पादक/पुरवठादार यांनी सहभाग देण्यासाठी त्यांना प्रवृत्त करावे.

**अहवाल :**

सदर कार्यक्रमांतर्गत भौतीक/अर्थीक साध्याचा विहीत प्रपत्रात नियमीतपणे दर महीन्याच्या ५ तारखेपर्यंत अहवाल सादर करणे जिल्हा कृषि अधिकारी यांना बंधनकारक राहील.

सोबत : प्रपत्रे १ ते ४

**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य्, पुणे-४११ ००१

प्रत माहीतीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादीत, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेनाव (पूर्व), मुंबई - ६५

प्रपत्र-१ : सन २०१४-१५ : जिल्हानिहाय कषि औजारे बॅंक स्थापन करण्याचा भौतीक / अर्थीक लक्षांक

| अ.क्र. | जिल्हा | एकूण उप विभाग | रु.१०.०० लाख मर्यादेतील केंद्रे | | | | रु.२५.०० लाख मर्यादेतील केंद्रे | | | | एकूण केंद्र | केंद्र हिस्सा अनुदान (रु. लाखात) | | | | राज्य हिस्सा अनुदान (रु. लाखात) | | | | एकूण अनुदान (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खुला | अनु.जाती | अनु.जमाती | एकूण | खुला | अनु.जाती | अनु.जमाती | एकूण | | खुला | अनु. जाती | अनु.जमाती | एकूण | खुला | अनु.जाती | अनु.जमाती | एकूण | |
| १ | ठाणे | ३ | १ | ० | १ | २ | ० | ० | ० | ० | २ | ३.०० | ०.०० | ३.०० | ६.०० | १.०० | ०.०० | १.०० | २.०० | ८.०० |
| २ | रायगड | ४ | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ६.०० | ०.०० | ०.०० | ६.०० | २.०० | ०.०० | ०.०० | २.०० | ८.०० |
| ३ | रत्नागिरी | ३ | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ६.०० | ०.०० | ०.०० | ६.०० | २.०० | ०.०० | ०.०० | २.०० | ८.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| **ठाणे विभाग** | | **१२** | **६** | **०** | **१** | **७** | **०** | **०** | **०** | **०** | **७** | **१८.००** | **०.००** | **३.००** | **२१.००** | **६.००** | **०.००** | **१.००** | **७.००** | **२८.००** |
| ५ | नाशिक | ४ | ० | १ | १ | २ | १ | ० | ० | १ | ३ | ७.५० | ३.०० | ३.०० | १३.५० | २.५० | १.०० | १.०० | ४.५० | १८.०० |
| ६ | धुळे | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ०.०० | ०.०० | ३.०० | ३.०० | ०.०० | ०.०० | १.०० | १.०० | ४.०० |
| ७ | नंदुरबार | २ | १ | ० | १ | २ | ० | ० | ० | ० | २ | ३.०० | ०.०० | ३.०० | ६.०० | १.०० | ०.०० | १.०० | २.०० | ८.०० |
| ८ | जळगांव | ३ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | २ | २ | १५.०० | ०.०० | ०.०० | १५.०० | ५.०० | ०.०० | ०.०० | ५.०० | २०.०० |
| **नाशिक विभाग** | | **१०** | **१** | **१** | **३** | **५** | **३** | **०** | **०** | **३** | **८** | **२५.५०** | **३.००** | **९.००** | **३७.५०** | **८.५०** | **१.००** | **३.००** | **१२.५०** | **५०.००** |
| ९ | अहमदनगर | ४ | ० | १ | १ | २ | २ | ० | ० | २ | ४ | १५.०० | ३.०० | ३.०० | २१.०० | ५.०० | १.०० | १.०० | ७.०० | २८.०० |
| १० | पुणे | ३ | १ | ० | ० | १ | २ | ० | ० | २ | ३ | १८.०० | ०.०० | ०.०० | १८.०० | ६.०० | ०.०० | ०.०० | ६.०० | २४.०० |
| ११ | सोलापूर | ३ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | ७.५० | ३.०० | ०.०० | १०.५० | २.५० | १.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| **पुणे विभाग** | | **१०** | **१** | **२** | **१** | **४** | **५** | **०** | **०** | **५** | **९** | **४०.५०** | **६.००** | **३.००** | **४९.५०** | **१३.५०** | **२.००** | **१.००** | **१६.५०** | **६६.००** |
| १२ | सातारा | ४ | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | २ | ३ | ७.५० | १०.५० | ०.०० | १८.०० | २.५० | ३.५० | ०.०० | ६.०० | २४.०० |
| १३ | सांगली | ३ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | ७.५० | ३.०० | ०.०० | १०.५० | २.५० | १.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| १४ | कोल्हापूर | ३ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ | २ | ७.५० | ७.५० | ०.०० | १५.०० | २.५० | २.५० | ०.०० | ५.०० | २०.०० |
| **कोल्हापूर विभाग** | | **१०** | **०** | **२** | **०** | **२** | **३** | **२** | **०** | **५** | **७** | **२२.५०** | **२१.००** | **०.००** | **४३.५०** | **७.५०** | **७.००** | **०.००** | **१४.५०** | **५८.००** |
| १५ | औरंगाबाद | ३ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | १०.५० | ०.०० | ०.०० | १०.५० | ३.५० | ०.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| १६ | जालना | २ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | १०.५० | ०.०० | ०.०० | १०.५० | ३.५० | ०.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| १७ | बीड | ३ | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ६.०० | ०.०० | ०.०० | ६.०० | २.०० | ०.०० | ०.०० | २.०० | ८.०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **८** | **४** | **०** | **०** | **४** | **२** | **०** | **०** | **२** | **६** | **२७.००** | **०.००** | **०.००** | **२७.००** | **९.००** | **०.००** | **०.००** | **९.००** | **३६.००** |
| १८ | लातुर | २ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | १०.५० | ०.०० | ०.०० | १०.५० | ३.५० | ०.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| १९ | उस्मानाबाद | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| २० | नांदेड | ३ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | ७.५० | ३.०० | ०.०० | १०.५० | २.५० | १.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| २१ | परभणी | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| २२ | हिंगोली | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| **लातुर विभाग** | | **९** | **४** | **१** | **०** | **५** | **२** | **०** | **०** | **२** | **७** | **२७.००** | **३.००** | **०.००** | **३०.००** | **९.००** | **१.००** | **०.००** | **१०.००** | **४०.००** |
| २३ | बुलढाणा | ३ | १ | १ | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ३.०० | ३.०० | ०.०० | ६.०० | १.०० | १.०० | ०.०० | २.०० | ८.०० |
| २४ | अकोला | २ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | ७.५० | ३.०० | ०.०० | १०.५० | २.५० | १.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| २५ | वाशिम | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| २६ | अमरावती | ३ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | ७.५० | ३.०० | ०.०० | १०.५० | २.५० | १.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| २७ | यवतमाळ | ४ | १ | ० | १ | २ | १ | ० | ० | १ | ३ | १०.५० | ०.०० | ३.०० | १३.५० | ३.५० | ०.०० | १.०० | ४.५० | १८.०० |
| **अमरावती विभाग** | | **१३** | **३** | **३** | **१** | **७** | **३** | **०** | **०** | **३** | **१०** | **३१.५०** | **९.००** | **३.००** | **४३.५०** | **१०.५०** | **३.००** | **१.००** | **१४.५०** | **५८.००** |
| २८ | वर्धा | ३ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | १०.५० | ०.०० | ०.०० | १०.५० | ३.५० | ०.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| २९ | नागपूर | ४ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | २ | १०.५० | ०.०० | ०.०० | १०.५० | ३.५० | ०.०० | ०.०० | ३.५० | १४.०० |
| ३० | भंडारा | २ | १ | १ | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ३.०० | ३.०० | ०.०० | ६.०० | १.०० | १.०० | ०.०० | २.०० | ८.०० |
| ३१ | गोंदिया | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३.०० | ०.०० | ०.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ०.०० | १.०० | ४.०० |
| ३२ | चंद्रपूर | ४ | २ | १ | १ | ४ | ० | ० | ० | ० | ४ | ६.०० | ३.०० | ३.०० | १२.०० | २.०० | १.०० | १.०० | ४.०० | १६.०० |
| ३३ | गडचिरोली | ३ | १ | ० | १ | २ | ० | ० | ० | ० | २ | ३.०० | ०.०० | ३.०० | ६.०० | १.०० | ०.०० | १.०० | २.०० | ८.०० |
| **नागपूर विभाग** | | **१८** | **७** | **२** | **२** | **११** | **२** | **०** | **०** | **२** | **१३** | **३६.००** | **६.००** | **६.००** | **४८.००** | **१२.००** | **२.००** | **२.००** | **१६.००** | **६४.००** |
| **एकुण** | | **९०** | **२६** | **११** | **८** | **४५** | **२०** | **२** | **०** | **२२** | **६७** | **२२८.००** | **४८.००** | **२४.००** | **३००.००** | **७६.००** | **१६.००** | **८.००** | **१००.००** | **४००.००** |

## Annexure-2 : POWER UTILIZATION IN AGRICULTURE kW/ha (2011)

| Sr. No. | District | Av. Land holding (ha) | Tractor | | Diesel Engines | | Ele. Engines | | Agril. Labourers | | Power Tillers | | Draft Animals | | Total Farm Power Availability (kW/ha) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | No. | Power av. | No. | Power av. | No. | Power av. | No. | Power av. | No. | Power av. | No. | Power av. | |
| 1 | Thane | 1.40 | 2017 | 0.150 | 3537 | 0.056 | 4666 | 0.048 | 695318 | 0.10 | 2690 | 0.042 | 1678 | 0.002 | 0.39 |
| 2 | Raigad | 1.08 | 1443 | 0.190 | 1918 | 0.053 | 9492 | 0.175 | 447075 | 0.11 | 936 | 0.026 | 2070 | 0.004 | 0.56 |
| 3 | Ratnagiri | 1.24 | 523 | 0.053 | 1000 | 0.021 | 4000 | 0.056 | 504506 | 0.10 | 526 | 0.011 | 4203 | 0.006 | 0.24 |
| 4 | Sindhudurg | 1.00 | 474 | 0.077 | 2000 | 0.069 | 3000 | 0.068 | 267885 | 0.08 | 631 | 0.022 | 3022 | 0.007 | 0.32 |
| | **Thane Dn.** | **1.19** | **4457** | **0.120** | **8455** | **0.048** | **21158** | **0.080** | **1914784** | **0.10** | **4783** | **0.027** | **10973** | **0.004** | **0.38** |
| 5 | Nashik | 1.53 | 50509 | 1.671 | 7342 | 0.051 | 102095 | 0.472 | 1363771 | 0.09 | 31 | 0.000 | 50782 | 0.024 | **2.28** |
| 6 | Dhule | 1.79 | 11961 | 0.495 | 1000 | 0.009 | 26000 | 0.150 | 520194 | 0.04 | 20 | 0.000 | 12526 | 0.007 | 0.70 |
| 7 | Nandurbar | 2.01 | 5261 | 0.351 | 1180 | 0.017 | 11780 | 0.110 | 497489 | 0.06 | 9 | 0.000 | 4595 | 0.004 | 0.54 |
| 8 | Jalgaon | 1.77 | 20738 | 0.684 | 2000 | 0.014 | 32000 | 0.147 | 1108027 | 0.07 | 38 | 0.000 | 20666 | 0.010 | **0.91** |
| | **Nashik Dn.** | **1.69** | **88469** | **0.888** | **11522** | **0.024** | **171875** | **0.241** | **3489481** | **0.07** | **98** | **0.000** | **88569** | **0.013** | **1.22** |
| 9 | Ahmadnagar | 1.32 | 33097 | 0.740 | 7000 | 0.033 | 103000 | 0.321 | 1294325 | 0.05 | 1215 | 0.006 | 86597 | 0.028 | **1.17** |
| 10 | Pune | 1.36 | 37932 | 1.013 | 13000 | 0.073 | 79000 | 0.295 | 1168293 | 0.06 | 370 | 0.002 | 37976 | 0.015 | **1.44** |
| 11 | Solapur | 1.89 | 18188 | 0.479 | 9018 | 0.050 | 40128 | 0.148 | 1096416 | 0.05 | 136 | 0.001 | 37419 | 0.014 | 0.74 |
| | **Pune Dn.** | **1.49** | **89217** | **0.743** | **29018** | **0.051** | **222128** | **0.258** | **3559034** | **0.06** | **1721** | **0.003** | **161992** | **0.019** | **1.12** |
| 12 | Satara | 0.75 | 19701 | 0.978 | 9000 | 0.094 | 30000 | 0.208 | 911309 | 0.09 | 438 | 0.005 | 9365 | 0.007 | **1.36** |
| 13 | Sangali | 1.25 | 15653 | 0.582 | 5000 | 0.039 | 30000 | 0.156 | 844826 | 0.06 | 537 | 0.004 | 9991 | 0.005 | 0.84 |
| 14 | Kolhapur | 0.72 | 17706 | 0.808 | 8000 | 0.077 | 23000 | 0.146 | 958834 | 0.08 | 1040 | 0.010 | 9352 | 0.006 | **1.12** |
| | **Kolhapur Dn.** | **0.87** | **53060** | **0.769** | **22000** | **0.067** | **83000** | **0.168** | **2714969** | **0.07** | **2015** | **0.006** | **28708** | **0.006** | **1.08** |
| 15 | Auragabad | 1.31 | 16658 | 0.582 | 2000 | 0.015 | 45000 | 0.219 | 730890 | 0.05 | 115 | 0.001 | 31261 | 0.016 | **0.87** |
| 16 | Jalna | 1.44 | 8489 | 0.368 | 4486 | 0.041 | 38271 | 0.232 | 557090 | 0.05 | 23 | 0.000 | 13776 | 0.009 | 0.69 |
| 17 | Beed | 1.33 | 6071 | 0.217 | 2900 | 0.022 | 41512 | 0.207 | 743059 | 0.05 | 18 | 0.000 | 38447 | 0.020 | 0.51 |
| | **Auragabad Dn.** | **1.35** | **31218** | **0.392** | **9386** | **0.025** | **124783** | **0.219** | **2031039** | **0.05** | **156** | **0.000** | **83484** | **0.015** | **0.69** |
| 18 | Latur | 1.65 | 7955 | 0.318 | 1013 | 0.009 | 28136 | 0.157 | 614472 | 0.05 | 17 | 0.000 | 30150 | 0.017 | 0.54 |
| 19 | Osmanabad | 1.94 | 9010 | 0.373 | 1800 | 0.016 | 111000 | 0.642 | 514100 | 0.04 | 17 | 0.000 | 7317 | 0.004 | **1.07** |
| 20 | Nanded | 1.42 | 3727 | 0.139 | 1700 | 0.013 | 31000 | 0.161 | 887943 | 0.06 | 9 | 0.000 | 2787 | 0.001 | 0.38 |
| 21 | Parbhani | 1.63 | 4790 | 0.147 | 700 | 0.005 | 20000 | 0.086 | 482414 | 0.03 | 16 | 0.000 | 3523 | 0.002 | 0.27 |
| 22 | Hingoli | 1.68 | 4312 | 0.298 | 3000 | 0.044 | 41000 | 0.396 | 381281 | 0.05 | 8 | 0.000 | 5317 | 0.005 | 0.79 |
| | **Latur Dn.** | **1.64** | **29794** | **0.242** | **8213** | **0.014** | **231136** | **0.262** | **2880210** | **0.04** | **67** | **0.000** | **49094** | **0.006** | **0.57** |
| 23 | Buldhana | 1.62 | 11488 | 0.534 | 3000 | 0.029 | 17000 | 0.110 | 818824 | 0.07 | 7 | 0.000 | 23549 | 0.016 | 0.75 |
| 24 | Akola | 1.73 | 6114 | 0.362 | 720 | 0.009 | 7710 | 0.064 | 436431 | 0.05 | 7 | 0.000 | 4404 | 0.004 | 0.48 |
| 25 | Washim | 1.91 | 5711 | 0.392 | 3000 | 0.044 | 17000 | 0.163 | 381466 | 0.05 | 17 | 0.000 | 1856 | 0.002 | 0.64 |
| 26 | Amravati | 1.73 | 8083 | 0.356 | 1000 | 0.009 | 22000 | 0.135 | 771525 | 0.06 | 5 | 0.000 | 5858 | 0.004 | 0.56 |
| 27 | Yavatmal | 2.21 | 6415 | 0.194 | 4000 | 0.026 | 22000 | 0.093 | 864545 | 0.05 | 10 | 0.000 | 4775 | 0.002 | 0.36 |
| | **Amravati Dn.** | **1.83** | **37811** | **0.348** | **11720** | **0.023** | **85710** | **0.110** | **3272791** | **0.06** | **46** | **0.000** | **40442** | **0.005** | **0.54** |
| 28 | Wardha | 2.24 | 4528 | 0.320 | 3000 | 0.045 | 15000 | 0.148 | 377967 | 0.05 | 5 | 0.000 | 16844 | 0.017 | 0.58 |
| 29 | Nagpur | 1.90 | 11033 | 0.621 | 6000 | 0.071 | 31000 | 0.244 | 594553 | 0.06 | 12 | 0.000 | 21487 | 0.017 | **1.01** |
| 30 | Bhandara | 0.95 | 6256 | 0.969 | 2000 | 0.065 | 8000 | 0.173 | 378453 | 0.11 | 0 | 0.000 | 12131 | 0.027 | **1.33** |
| 31 | Gondia | 0.87 | 4094 | 0.674 | 3000 | 0.104 | 6000 | 0.138 | 393663 | 0.12 | 3 | 0.000 | 13748 | 0.032 | **1.06** |
| 32 | Chandrapur | 1.78 | 7446 | 0.511 | 9000 | 0.131 | 10000 | 0.096 | 604778 | 0.08 | 106 | 0.002 | 5615 | 0.006 | 0.82 |
| 33 | Gadchiroli | 1.65 | 3053 | 0.570 | 15000 | 0.592 | 3000 | 0.078 | 408715 | 0.14 | 9 | 0.000 | 86 | 0.000 | **1.38** |
| | **Nagpur Dn.** | **1.56** | **36410** | **0.566** | **38000** | **0.125** | **73000** | **0.158** | **2758129** | **0.08** | **135** | **0.000** | **69911** | **0.016** | **0.94** |
| | **Total** | **1.44** | **370436** | **0.528** | **138314** | **0.042** | **1012790** | **0.202** | **22620437** | **0.06** | **9021** | **0.003** | **533173** | **0.011** | **0.84** |

**प्रपत्र-३**

**हमीपत्र नमुना**

(रु. १०००/- च्या बॉन्डपेपरवर)

**( कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण उप अभियानांतर्गत भाडेतत्वावर सेवा सुविधा पुरविणारे औजारे बॅन्क स्थापणे भाडेतत्वावर सेवा सुविधा पुरविणारे केंद्रे स्थापन करण्याबाबत लाभधारकाने द्यायचे हमीपत्र)**

---

मी, ______________________________(संपूर्ण नाव), वय_______वर्षे, धारण केलेले पद_ ______________________________________________________________

केंद्राचा प्राधिकृत प्रतिनिधी या नात्याने कृषि विभागास **हमीपत्र** लिहून देतो की,

**१.** मी स्वतः कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरवीण्यासाठी सक्षम असून त्या अनुषंगाने यापूर्वी केलेल्या कामांबाबत प्रमाणित तपशील सोबत जोडला आहे./आमची संस्था नोंदणीकृत असून नोंदणी क्र. ------- वर्ष ---------- आहे. संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्राची साक्षांकीत प्रत सोबत सहपत्रीत केली आहे.

**२.** आमच्या संस्थेस कृषि क्षेत्राशी निगडीत कामाचा व्यापक अनुभव आहे. संस्थेच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन मध्ये कृषि विषयक कामांचा स्पष्ट उल्लेख असून कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधेचा संस्थेस अनुभव आहे. त्याबाबत कागदपत्रे सोबत सहपत्रीत केली आहेत.

**३.** कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या कृषि यांत्रीकीकरण उप अभियानांतर्गत भाडेतत्वावर सेवा सुविधा पुरविणारे औजारे बॅन्क स्थापणे व भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविधा पुरविणारे केंद्रे स्थापन करण्याबाबत आमची संस्था इच्छूक असून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व प्रशिक्षित तांत्रीक कर्मचारी वृंद आमच्याकडे/संस्थेकडे आहे.

**४.** सदर केंद्र स्थापन करण्यासाठी आमच्या जिल्ह्यातील पीक रचनेनुसार सर्व कृषि औजारांची सुरुवातीस स्वखर्चाने (रु.१० लाख/रु.२५ लाख पर्यंत रकमेची औजारे) खरेदी करण्यास मी/संस्था तयार आहे. त्यासाठी आवश्यकतेनुरुप बॅन्क कर्ज प्रकरण करण्याची जबाबदारी माझी/संस्थेची राहील व त्यासाठी येणारा सर्व खर्च मी/संस्था करेल. प्रत्यक्ष औजारे खरेदी नंतर अनुदानाची रक्कम औजारे खरेदीच्या पावत्या सादर केल्यानंतर व प्रत्यक्ष तपासणी करुन आमच्या बॅकेत जमा केली जाईल याची मला सुस्पष्ट कल्पना असून त्यास माझी पूर्णतः संमती आहे.

**५.** अनुदानावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्रासाठी खरेदी करण्यात येणा-या संयंत्रे/औजारे/उपकरणे यांचे किमान सहा वर्षे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाणवट करता येणार नाही याची मला स्पष्ट कल्पना असून त्यास माझी संमती आहे. अशा प्रकारे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाणवट केल्यास अनुदानापोटी मिळालेली संपूर्ण रक्कम व्याजासह एकरकमी वसूल करण्यास माझी विनाशर्त अनुमती आहे.

**६.** अनुदानाचा लाभ घेतल्याने त्याद्वारे प्राप्त करुन घेण्यात येणा-या औजारांद्वारे/उपकरणांद्वारे जवळपासच्या गावात शेतक-यांना भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा माफक दरात/शासनाने निर्धारीत केलेल्या दरात उपलब्ध करुन देण्यास मी बांधील राहील याची मला कल्पना असून त्यास माझी संमती आहे.

**७.** सदर संयंत्रे, औजारे, उपकरणे यांची निगा राखणे, देखभाल-दुरुस्ती करणे याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील याची मला कल्पना असून त्यास माझी संमती आहे.

**८.** याबाबत शासनाने ठरवून दिलेल्या प्रपत्रात नियमीतपणे अहवाल सादर करण्याची माझी जबाबदारी आहे याची मला कल्पना असून त्यास माझी संमती आहे.

**९.** योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अशा केंद्रांसाठी इतर लागू असणा-या सर्व जबाबदा-या पार पाडण्याची मी/संस्था हमी देत आहे.

**१०.** वरील व या अनुषंगाने शासनास आवश्यक सर्व बाबी व नियमांचे पालन करण्याची मी/संस्था या हमीपत्राद्वारे हमी देत आहे.

***लिहून घेणार*** | ***लिहून देणार***

( ----------------------------------------) | (---------------------------------)

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | पदनाम ----------------------------

---------------------------------------

***साक्षीदार***

१. -----------------------------------------------------.

२. -----------------------------------------------------.

(वरील हमीपत्र नमुन्यादाखल देण्यात येत असून याबाबत कायदेशीर तरतुदींचे अनुषंगाने सरकारी वकील किंवा विधी सल्लागारांच्या मदतीने आवश्यकते स्थानीक गरजेनुरुप बदल करण्यास हरकत नाही.)

**प्रपत्र-४:** कृषि हवामान प्रकारानुरुप व पीक रचनेनुसार आवश्यक कृषि औजारांची गरज दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कृषि हवामान प्रकार | घेण्यात येणारी पिके | प्रस्तावीत कृषि औजारे |
|---|---|---|---|
| १ | दक्षिण कोकण किनारपट्टी विभाग | भात, रागी, वरई, कुळीथ, तीळ, भुईमुग, आंबा, सुपारी, काजू, नारळ, फणस, मसाल्याची पिके. | **नांगरटः** २० ते ३५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, चिखलणी यंत्र<br>**पेरणी व खत मात्रा देणेः** राईस प्लॅन्टर, राईस सीडर, बी व खत पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी :** पॉवर विडर, कोळपे, कोनोविडर, रोटरी टिलर<br>**फवारणीः** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, बूम स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणीः** रिपर, स्वयंचलीत रिपर कम बाइंडर, आंबा झेला, चिकू झेला<br>**मळणीः** पॅडी थ्रेशर, बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, काजू सोलणी व बी फोडणी यंत्र |
| २ | उत्तर कोकण किनारपट्टी विभाग | भात, वरई, उडीद, पालेभाज्या, तीळ, केळी, चिक्कू, आंबा इ. | **नांगरटः** २० ते ३५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, चिखलणी यंत्र<br>**पेरणी व खत मात्रा देणेः** राईस प्लॅन्टर, राईस सीडर, बी व खत पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणीः** पॉवर विडर, कोळपे, कोनोविडर, रोटरी टिलर<br>**फवारणीः** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, बूम स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणीः** रिपर, स्वयंचलीत रिपर कम बाइंडर, आंबा झेला, चिकू झेला<br>**मळणीः** पॅडी थ्रेशर, बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर |
| ३ | पश्चिमघाट विभाग | भात, रागी, रब्बी ज्वारी, हरभरा, गहू, भुईमुग, सोयाबीन, ऊस, फळबागा आंबा, करवंद, इ. भाजीपाला. | **नांगरटः** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, चिखलणी यंत्र<br>**पेरणी व खत मात्रा देणेः** राईस प्लॅन्टर, राईस सीडर, बी व खत पेरणी यंत्र, ऊस लागवड यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणीः** पॉवर विडर, कोळपे, कोनोविडर, रोटरी टिलर, उस पाचट कुट्टी यंत्र<br>**फवारणीः** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, बूम स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणीः** स्वयंचलीत रिपर कम बाइंडर, बहुपीक काढणी यंत्र, आंबा झेला, चिकू झेला, उस तोडणी यंत्र<br>**मळणीः** रिपर, पॅडी थ्रेशर, बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, शेंगा फोडणी यंत्र |
| ४ | संक्रमण विभाग-१ | खरीप तृणधान्ये, भुईमूग, सोयाबीन, ऊस, बटाटा, कांदा, मिरची, टोमॅटो इ. आंबा, केळी, द्राक्ष, पेरु, काजू.इ. | **नांगरटः** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर<br>**पेरणी व खत मात्रा देणेः** बी व खत पेरणी यंत्र, ऊस लागवड यंत्र, कांदा लागवड यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणीः** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर, उस पाचट कुट्टी यंत्र<br>**फवारणीः** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणीः** बहुपीक काढणी यंत्र, आंबा झेला, उस तोडणी यंत्र<br>**मळणीः** बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, शेंगा फोडणी यंत्र |
| ५ | संक्रमण | खरीप व रब्बी | **नांगरटः** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर |

**प्रपत्र-४:** कृषि हवामान प्रकारानुरुप व पीक रचनेनुसार आवश्यक कृषि औजारांची गरज दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कृषि हवामान प्रकार | घेण्यात येणारी पिके | प्रस्तावीत कृषि औजारे |
|---|---|---|---|
| | विभाग-२ | ज्वारी, सोयाबीन, बाजरी, भुईमुग, गहू, ऊस, उडीद, तूर, हरभरा इ. | **पेरणी व खत मात्रा देणे:** रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र (बीबीएफ प्लॅन्टर), बी व खत पेरणी यंत्र, ऊस लागवड यंत्र, कांदा लागवड यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी:** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर,<br>**फवारणी:** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणी:**बहुपीक काढणी यंत्र, उस तोडणी यंत्र, उस पाचटकुट्टी यंत्र<br>**मळणी:** बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, शेंगा फोडणी यंत्र |
| ६ | अवर्षणप्रवण प्रदेश | बाजरी, ज्वारी, भुईमुग, करडई, कडधान्ये | **नांगरट:** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर<br>**पेरणी व खत मात्रा देणे:** रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र(बीबीएफ प्लॅन्टर) , बी व खत पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी:** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर<br>**फवारणी:** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>पीक कापणी/काढणी: बहुपीक काढणी यंत्र<br>**मळणी:** बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, शेंगा फोडणी यंत्र, डालमील |
| ७ | निश्चित पावसाचा प्रदेश | ज्वारी, कापूस, बाजरी, गळीतधान्य, कडधान्य, हरभरा, करडई, तीळ, ऊस इ. | **नांगरट:** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, डिस्क हॅरो, कल्टीपॅकर<br>**पेरणी व खत मात्रा देणे:** झीरो टिल ड्रील, बी व खत पेरणी यंत्र, प्लॅन्टर्स, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र (बीबीएफ प्लॅन्टर), रिजर सीडर, कापूस पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी:** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर<br>**फवारणी:** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणी:** बहुपीक काढणी यंत्र, कापूस काढणी यंत्र, रिपर, कापूस स्टॉक पूलर व श्रेडर, उस तोडणी यंत्र, उस पाचट कुट्टी यंत्र<br>**मळणी:** बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, डालमील |
| ८ | मध्यम पावसाचा प्रदेश | कापूस, ज्वारी, तूर, गहू, कडधान्ये, गळीतधान्य. | **नांगरट:** ३५ ते ४५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, कल्टीपॅकर<br>**पेरणी व खत मात्रा देणे:** झीरो टिल ड्रील, बी व खत पेरणी यंत्र, प्लॅन्टर्स, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र (बीबीएफ प्लॅन्टर), रिजर सीडर, कापूस पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी:** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर<br>**फवारणी:** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>पीक कापणी/काढणी: बहुपीक काढणी यंत्र, कापूस काढणी यंत्र, रिपर, कापूस स्टॉक पूलर व श्रेडर, मळणी: बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, डालमील |
| ९ | अति पावसाचा प्रदेश | भात, हरभरा, कडधान्ये, गळीतधान्ये इ. | **नांगरट:** २० ते ३५ अश्वशक्ती पर्यंत ट्रॅक्टर, पल्टी नांगर, रोटाव्हेटर, कल्टीव्हेटर, चिखलणी यंत्र<br>**पेरणी व खत मात्रा देणे:** राईस प्लॅन्टर, राईस सीडर, बी व खत पेरणी यंत्र, युरिया ब्रीकेट ॲप्लीकेटर<br>**खुरपणी/निंदणी:** पॉवर विडर, कोळपे, रोटरी टिलर<br>**फवारणी:** नॅपसॅक / पॉवर स्प्रेअर, एचटीपी स्प्रेअर<br>**पीक कापणी/काढणी:** बहुपीक काढणी यंत्र, रिपर, स्वयंचलीत रिपरकम बाइंडर<br>**मळणी:** पॅडी थ्रेशर, बहुपीक मळणी यंत्र, विनोइंग पंखे, क्लीनर कम ग्रेडर, डालमील |

**कृषि औजारे बॅन्क भांडवली अनुदानासाठी लाभधारकाने करावयाच्या अर्जाचा नमुना**

प्रती,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

-------------------------------

**विषय :** कृषि औजारे बॅन्क भांडवली अनुदानासाठी अर्ज

१. लाभधारकाचे संपूर्ण नाव व सविस्तर पत्ता ----------------------------

२. लाभधारकाचा प्रकार - प्रगतीशील शेतकरी/शेतक-यांचे नोंदणीकृत गट/ग्रामीण उद्योजक

३. लाभधारकाचा प्रवर्ग - अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/खुला, महीला/पुरुष/संस्था

४. कृषि औजारे बॅन्कसाठी प्रत्यक्षात केलेली भांडवली गुंतवणूक रु.------------(पावत्या जोडाव्यात)

५. खरेदी केलेल्या औजारांचा तपशील

| अ.क्र. | औजाराचे तांत्रीक नाव | प्रकल्पात नमुद केलेले नाव | बीलानुसार खरेदीची प्रत्यक्ष रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| एकूण | | | |

६. औजारांची खरेदी विहीत केलेल्या पध्दतीने केले आहे काय?

७. अनुदान रकमेची केलेली मागणी रु.------------

८. यापूर्वी आम्ही कोणत्याही योजनेतून सेवा-सुविधा केंद्र स्थापनेसाठी औजारे संचाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला आहे/नाही

९. शासन मान्यताप्राप्त औजारांच्या स्पेसिफिकेशन्स प्रमाणे औजारे खरेदी केली आहेत

१०. अनुदानाची रक्कम आमच्या बॅन्क खात्यात ------------------------ जमा करण्यास आमची हरकत नाही

११. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, कर भरणा, वॉरन्टीबाबत आम्ही कार्यवाही केली आहे (प्रत जोडावी)

१२. ठरवून दिलेल्या माफक भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुढील किमान सहा वर्ष पुरविण्यास आमची तयारी आहे

१३. भांडवली अनुदानाचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास येवून सिध्द झाल्यास अनुदानाची सर्व रक्कम आम्ही एकरकमी शासनाकडे भरणा करण्यास तयार आहोत

१४. संयुक्त पथकाच्या तपासणी अहवालाची प्रत

१५. संयुक्त पथकाच्या तपासणीने अनुदानासाठी शिफारस केलेली रक्कम रु.-----------------

अर्जदाराची स्वाक्षरी
अर्जदाराचे संपूर्ण नाव
दुरध्वनी / मोबाईल क्र.

सदर अर्जदाराच्या संपूर्ण प्रकरणाची मी व्यक्तीशः खात्री केली असून त्यानुसार अनुदान अदायगीसाठी शिफारस करीत आहे.

तालुका कृषि अधिकारी----------
संपूर्ण नाव व मोबाईल क्र.

उपविभागीय कृषि अधिकारी-----------------
संपूर्ण नाव व मोबाईल क्र.

# जिल्हा स्तरीय संयुक्त तपासणी पथकाचे प्रपत्र

१. तपासणीची तारीख

२. संयुक्त तपासणी पथकात समाविष्ठ सदस्य

| तपासणी अधिका-याचे नाव | पदनाम | कार्यालयीन पत्ता |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

३. अ) लाभधारकाचे संपूर्ण नाव, सविस्तर पत्ता
   ब) आधार कार्ड क्र., बॅन्केचा तपशील, दुरध्वनी क्र., इमेल आयडी

४. अ) लाभधारकाचा प्रवर्ग
   ब) प्रगतीशील शेतकरी/शेतक-यांचे नोंदणीकृत गट/ग्रामीण उद्योजक

५. इतर अर्थ संस्थांचे अर्थसहाय्य घेतले असल्यास त्याचा सविस्तर तपशील

६. प्रस्तावीत प्रकल्पातील औजारे बॅन्कचा तपशील

| अ.क्र. | औजाराचे तांत्रीक नाव | प्रकल्पात नमुद केलेले नाव | बीलानुसार खरेदीची प्रत्यक्ष रक्कम | संयुक्त तपासणी पथकाने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकूण | | | | |

७. लाभधारकाकडील उपलब्ध सुविधा
   अ) औजारे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी व्यवस्था/शेड
   ब) अनुभवी व प्रशिक्षीत मनुष्यबळ (संख्या)
   क) औजारे देखभाल व दुरुस्तीसाठी केलेली व्यवस्था
   ड) अभिलेख जतन करुन ठेवण्यासाठी केलेली व्यवस्था
   इ) इतर अनुषंगीक बाबी

८. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, कर भरणा, वॉरन्टीबाबत केलेली कार्यवाही

९. औजारे बॅन्क स्थापनेसाठी खरेदी केलेल्या औजारांची एकूण रक्कम

१०. यंत्रसामुग्री व औजारे सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत लाभधारकाची लेखी सहमती

११. माफक दराने सेवा-सुविधा पुरवठ्याबाबत लाभधारकाची लेखी सहमती

१२. अनुदान वजाजाता लाभधारकाने स्वनिधीतून भरलेली रक्कम रु.

१३. संयुक्त तपासणी पथकाने अनुदान रकमेसाठी केलेली शिफारस रु.

१४. इतर अनुषंगीक मुद्दे

संयुक्त तपासणी पथकातील प्रत्येक सदस्याची स्वाक्षरी घ्यावी

**<u>कृषि औजारे बॅन्कने भाडे तत्वावर औजारे पुरवठ्याबाबत ठेवायच्या अभिलेख नोंदवहीचा नमुना</u>**

| अ. क्र. | तारीख | भाड्याने औजारे सेवा पुरविलेल्या शेतक-याचे नाव | त्यांचा पत्ता, संपर्क दुरध्वनी क्र. | भाड्याने दिलेल्या औजाराचा प्रकार | वापराचा कलावधी (तास) | भाड्याचा दर (रु.) औजार प्रकार निहाय रु/तास/दिवस क्षेत्र | भाड्याची एकूण रक्कम (रु.) | दिलेला अग्रीम (रु.) | शिल्ल्क भाडे रक्कम (रु.) | सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

सदर अभिलेख नोंदवही संबंधीत तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पृष्ठभागावर व शेवटच्या पानावर प्रमाणित करुन स्वाक्षरी करावी. त्याबाबत क्षेत्रीय भेटीच्या वेळी तपासणी करुन अभिप्राय नोंदवावेत.